गोपनीय/अतितात्काळ

क्र.पोमसं/२/१०(५)/ भापोसे बॅच-६९/१८५/२०१८
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- ३१/१२/२०१८.

संदर्भ :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. आयपीएस-१७१८/प्र. क्र. ३०८/पोल-१ अ, दि. ३१/१२/२०१८

विषय :- परिविक्षाधिन सहायक पोलीस अधीक्षक (भापोसे) आणि पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, मधील कलम २२ (न) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, परिविक्षाधिन सहायक पोलीस अधीक्षक (भापोसे), आणि पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिका-यांच्या बदल्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याव्दारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुम्माका सुदर्शन, भापोसे | नाशिक ग्रामीण | उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग, जि. यवतमाळ |
| २. | श्री. सचिन बारी, रापोसे | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जालना बदली आदेशाधिन | उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड उपविभाग, जि. पुणे |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत घटक प्रमुखांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून, तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आ. ज्या ठिकाणी निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर कार्यमुक्त करावे.

इ. बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

ई. सदर बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिशः** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

ऊ. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस उपअधीक्षकांकडे सोपवावा.

ए. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४, व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस अधीक्षक, यवतमाळ / पुणे ग्रामीण / नाशिक ग्रामीण / जालना

प्रत :-

विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. अ. अ. खोचरे,** कक्ष अधिकारी)

प्रत:-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२(लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (सस्नेह).
जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ /पुणे / नाशिक ग्रामीण / जालना (सस्नेह)
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६, व ४०.

**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश **"पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) बदली"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.

**पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची पदस्थापना करणेबाबत......**

Dem 2

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्रमांक : आयपीएस-१७१८/प्र.क्र.३०८/पोल-१**
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ३१ डिसेंबर, २०१८

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१४ मधील कलम २२ (न) च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील नमूद भारतीय पोलीस सेवेतील व राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्यांची नावे | पदस्थापना |
|---|---|---|
| **०१** | **०२** | **०४** |
| ०१ | श्री. मुम्माका सुदर्शन, भापोसे | उप विभागीय पोलीस अधिकारी, पुसद, उप विभाग, जि. यवतमाळ. |
| ०२ | श्री.सचिन बारी, रापोसे मुख्यालय जालना (बदली आदेशाधीन) | उप विभागीय पोलीस अधिकारी, दौंड, उप विभाग, जि. पुणे |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता नियंत्रक अधिकारी यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीत अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( कैलास गायकवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-** महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. अ.मु.स.(गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

५. अ.मु.स. (अ. व सु.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती / पुणे परिक्षेत्र पुणे.
८. पोलीस अधीक्षक, यवतमाळ, पुणे ग्रामीण
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१०. संबधीत अधिकारी.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ/ पुणे
१३. सहाय्यक संचालक ( भापोसे कक्ष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती, कार्यासन पोल-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.